
भगवान बुद्धांचे सेवक (उपस्थाक)

# आनंद

(मराठी)



विपश्यना विशोधन विन्यास

## भगवान बुद्धांचे सेवक (उपस्थाक)

# आनंद

**(बहुश्रुत, स्मृतिमान, प्रवीण, धृतिमान, सेवक भिक्षूंमध्ये अग्र)**

मराठी


**विपश्यना विशोधन विन्यास**

**धम्मगिरी, इगतपुरी**

**M37 - आनंद भगवान बुद्धांचे सेवक (उपस्थाक)**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०१९

**मूल्यः रु. ९०.००**

ISBN 978-81-7414-428-7

**प्रकाशकः**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोनः ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०;
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रकः**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# भगवान बुद्धांची उद्घोषणा

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं बहुस्सुतानं यदिदं आनन्दो।”**

“भिक्षूनों! माझ्या बहुश्रुत भिक्षूश्रावकांमध्ये अग्र (सर्वश्रेष्ठ) आहे आनंद.”

**********

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं सतिमन्तानं यदिदं आनन्दो।”**

“भिक्षूनों! माझ्या स्मृतिमान भिक्षूश्रावकांमध्ये अग्र आहे आनंद.”

**********

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं गतिमन्तानं यदिदं आनन्दो।”**

“भिक्षूनों! माझ्या प्रवीण (चतुर) भिक्षूश्रावकांमध्ये अग्र आहे आनंद.”

**********

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं धितिमन्तानं यदिदं आनन्दो।”**

“भिक्षूनों! माझ्या धृतिमान भिक्षूश्रावकांमध्ये अग्र आहे आनंद.”

**********

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं उपट्ठाकानं यदिदं आनन्दो।”**

“भिक्षूनों! माझ्या सेवक भिक्षूश्रावकांमध्ये अग्र आहे आनंद.”

— *अङ्गुत्तरनिकाय (१.१.२१९-२२३)*

# आयुष्मान आनंद

# आयुष्मान आनंद

## विषयानुक्रमणिका

**प्रकाशकीय ........................................................ xi**

**मनोकामना पूर्ण झाली ...........................................१**

आनंदचा जन्म ..................................................१

प्रव्रज्या ग्रहण ..................................................१

सेवक पदाची कामना ...........................................२

सेवा-सुख .........................................................५

**भगवानांद्वारे आनंदना उपदेश ................................७**

सत्पुरुषाचा सुगंध ...............................................७

त्रिरत्नांच्या प्रती श्रद्धाभाव.........................................८

संघदान अधिक फलदायक ................................... १०

लाभ-सत्कार अहितकर ...................................... १२

धर्माचे सनातन स्वरुप ........................................ १३

धर्मदूताची पाच लक्षण ........................................ १५

नव-प्रव्रजितांसाठी पाच बाबींची शिकवण ........................ १६

उत्तरोत्तर कुशल कर्म करण्याचा प्रयत्न ........................ १७

आयुष्मान फग्गुनाला तथागताचा दर्शन-लाभ .................... १९

**भवमुक्तीचे साधन............................................२२**

'निरोध' कशाला म्हणतात? ..................................... २२

'लोक' का म्हटले जाते? ........................................ २२

भगवानांकडून संक्षिप्त उपदेश ऐकला ......................... २३

खरे कठिणतम लक्ष्य ............................................ २५

वेदना व त्यांचा निरोध........................................... २७

ब्रह्मयानच मुक्तीयान आहे ........................................ २८

आत्म-अनुसंधान ........................................ २९
सुख-दुःख प्रतीत्य-समुत्पन्न ........................................ ३१
मूर्ख व पंडित व्यक्तीची ओळख ........................................ ३३
आनापान-स्मृती समाधीने सुख विहार ........................................ ३६
आयुष्मान गिरिमानंदांना दहा संज्ञाचे ज्ञान ........................................ ३७
दोन प्रकारची पर्येषणा (शोध) ........................................ ४२
संयोजनांच्या प्रहाणाची प्रतिपदा (मार्ग) ........................................ ४४
कलह-विवादाने अडथळा ........................................ ४५

**तुम्हेहि किच्चं आतप्पं, अक्खातारो तथागता .............. ४७**

इंद्रिय-संयमाचा उपदेश ........................................ ४७
उपेक्षाभावातही आसक्ती परिनिवृत्ती (निर्वाणा)साठी योग्य नाही ४९
स्मृतिप्रस्थानांच्या भावनेचे फळ ........................................ ५१

**आनंदद्वारे धर्माची व्याख्या .............................. ५३**

कामासक्तीतून मुक्तीचा उपाय ........................................ ५३
छंद-रागच (आसक्तीच) बंधन आहे ........................................ ५३
ब्रह्मचर्याचे लक्ष्य ........................................ ५४
धर्माचे तीन स्कंध ........................................ ५५
चार स्मृतीप्रस्थानांच्या अभ्यासाने अनागामी फळाची प्राप्ती ...... ५६
उपादानामुळे अहंभाव ........................................ ५८
असा धर्म ज्यामुळे अमुक्त चित्त विमुक्त होईल ........................................ ५९
आनंदची धर्मदेशनेची पद्धत ........................................ ६०
उत्तम ब्रह्मचर्यवास ........................................ ६२
भूतकाळ व वर्तमान काळातील धर्मांच्यात (विचारात) आसक्त होऊ नका ६४
मध्यम मार्गाचा उपदेश ........................................ ६६

**भगवानांद्वारे आनंदची प्रशंसा .......................... ७०**

शाल वनाचे आत्यंतिक वर्णन ........................................ ७०
सफल शीलव्रत ........................................ ७१
चालून लोकाचा अंत करणे शक्य नाही. ........................................ ७१
चित्ताच्या प्रसन्नतेचा सुपरिणाम ........................................ ७३

बुद्ध निंदित कर्माच्या पलिकडे ........ ७५
शैक्ष्यमार्गाची व्याख्या ........ ७७
आनंदची ओळख ........ ७८

## गुणांची खाण आनंद........८१

आनंदची लोकप्रियता ........ ८१
सर्वांचे हित-चिंतक आनंद ........ ८२
धम्मकथिक आनंद ........ ८२
आनंदची वस्त्र व्यवस्था ........ ८३
तबेल्यातून भिक्षा आणणे ........ ८५
अस्पृश्य कन्या ........ ८७
आनंदबोधी ........ ८८

## आनंद व सारिपुत्तातील परस्पर स्नेहभाव ........ ९२

सारिपुत्तांच्या प्रती भगवानांचा भाव ........ ९२
बहुश्रुत आनंदच धर्मरत्न ........ ९३
पाच गुणांनी युक्त आयुष्मान आनंद ........ ९४
स्त्रोतापन्न चार गुणांनी युक्त ........ ९५
अनाथपिंडिकाचा मृत्यू........ ९६
सारिपुत्तांचे परिनिर्वाण ........ ९८

## विविध प्रकरण ........१००

मधुपिडिंकोपदेश ........१००
हाडांच्या सापळ्याची आसक्ती कशी? ........१००
स्नानाने शुद्धी-मुक्ती नाही ........१०१
रोग्याची सेवा ........१०२
शिव्यांचा वर्षाव........१०५
लोक-हितासाठी तथागत मौन होतात ........१०८
हत्तींनी केली तथागताची सेवा ........१०९
महाप्रजापती गोतमीला प्रव्रज्या........१११
भिक्षूणी थुल्लतिस्साचा संघाद्वारे बहिष्कार ........११६
भिक्षुणी थुल्लनंदाचा संघाद्वारे बहिष्कार........११७

लिच्छविंच्या भयाचे निवारण........................................११८
बोधिराजकुमार....................................................१२०

**भगवानांचे महापरिनिर्वाण व सेवक आनंद.............. १२५**

वज्जींना सात अपरिहानीय धर्मांचा उपदेश .....................१२५
भिक्षूंना सात अपरिहानीय धर्मांचा उपदेश.......................१२८
दुराचाराचे दुष्परिणाम आणि सदाचाराचे सुपरिणाम ...........१३०
चार आर्यसत्यांची श्रेष्ठता ........................................१३३
धर्म आदर्शाचा उपदेश ............................................१३३
वैशालीत चारिका ..................................................१३६
आत्मशरण होऊन विहार करावा ...............................१३७
बुद्धाला इच्छामृत्यूची शक्ती प्राप्त...............................१३९
माराद्वारे भगवानांना याचना.......................................१४०
भगवानांद्वारे आयुसंस्काराचा त्याग..............................१४१
महाभूकंपाचे प्रकट होणे आणि त्याची कारणे ..................१४२
मारकथा ...........................................................१४३
आनंदद्वारे भगवानांना याचना ...................................१४४
अंतिम वैशाली दर्शन...............................................१४७
धर्माच्या चार कसोट्या.............................................१४९
अंतिम भोजन ......................................................१५०
अशुद्ध जल शुद्ध झाले............................................१५१
पुक्कुस मल्लपुत्त ...................................................१५२
चुंद कर्मारपुत्राला सांत्वना ........................................१५३
भगवानांच्या जीवनाची अंतिम वेळ ..............................१५४
आयुष्मान उपवाण व देवतांचे रुदन-क्रंदन ......................१५५
चार दर्शनीय स्थळ .................................................१५६
स्त्रियांसोबत व्यवहार...............................................१५७
तथागताच्या शरीराचा अंतिम संस्कार कसा व्हावा.............१५७
चार प्रकारचे स्तूप .................................................१५८
आनंदचे अद्‌भुत गुण ..............................................१५८
महासुदर्शन कथा ..................................................१६०
मल्लांना दर्शन करविले............................................१६४

सुभद्रची प्रव्रज्या ........................................१६५
तथागतांची अंतिम वाणी ....................................१६७
परिनिर्वृत्ती कथा ..........................................१६९
तथागतांचे पार्थिव शरीर ....................................१७०
आनंदची व्यथा ............................................१७२

**चिरं तिट्ठतु सद्धम्मो (सद्धर्म चिरस्थायी होवो) ........... १७४**

चार स्मृतिप्रस्थान - चिरस्थायी सद्धर्माचे रहस्य .................१७४
संघात विवादाचे कारण ......................................१७६
दहा प्रसादनीय धर्म - भगवानांनंतर भिक्षूंचे मार्गदर्शक .........१८०

**धम्म संगीती ..............................................१८३**

भगवानांच्या वाणीचे वेळे पूर्वीच संगायन का? ...................१८३
आयुष्मान आनंदना प्रथम धम्म संगीतीत सामील करणे ........१८४
आनंद अरहंत झाले .........................................१८५
संगायन सभेत आयुष्मान आनंदचा प्रवेश .......................१८६
बहुश्रुत आनंदनी उत्तरदायित्व सांभाळले ........................१८६
आनंदचे परिनिर्वाण .........................................१८८

**अतित कथा ..............................................१८९**

भगवान पदुमुत्तरांचा शासनकाळ ................................१८९
भगवान पदुमुत्तरांची वाणी ....................................१९१
भगवान कश्यपांचा शासनकाळ .................................१९२
भगवान गौतमांचा शासनकाळ ..................................१९३

**कल्याण-मार्ग सुरु राहावा .....................................१९४**

**परिशिष्ठ - १ ..............................................१९६**

आयुष्मान आनंदच्या काही गाथा ...............................१९६

विपश्यना साधना केंद्र.........................................१९९

# प्रकाशकीय

# प्रकाशकीय

पिढी दर पिढी भगवानांच्या वाणीला पाठ करुन परियत्ति व पटिपत्तीला ज्या भिक्षूसंघाने आपल्या येणाऱ्या पिढ्यांसाठी उपलब्ध करुन दिले, त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञतेचा भाव उत्पन्न होणे स्वाभाविकच आहे. परंतु सर्वात जास्त आयुष्मान आनंदांच्या प्रती, ज्यांनी भगवानांच्या वाणीला पाठ करुन पुढच्या पिढ्यांसाठी परियत्तीला सुलभ बनविले.

ह्या पुस्तकात भगवान गौतम बुद्धांचे सेवक आयुष्मान आनंदांचा जीवनवृत्तांत स्पष्ट केला आहे.

आपल्या पूर्वजन्मातील पुण्य कर्मांच्या फळामुळे आयुष्मान आनंद कपिलवस्तूच्या शाक्यकुळात भगवानांचे सख्खे काका अमितोदनांचे पुत्र होऊन जन्मले. त्यांच्या जन्माच्या वेळी परिवार व नातेवाईकांत मोठे हर्षोल्लासाचे वातावरण होते. म्हणून यांचे नामकरण 'आनंद' केले गेले.

--------------

भगवानांचे वय दिवसेंदिवस वाढत जात होते. ज्यांनी आपल्यासाठी एका स्थायी सेवकाच्या (उपस्थाक) आवश्यकतेला भिक्षूंसमोर व्यक्त केले. आयुष्मान सारिपुत्त, महामोग्गल्लान व इतर अनेक महाश्रावकांनी भगवानांना आपल्यासाठी ह्या पदाची याचना केली. परंतु भगवानांना ह्यापैकी कोणीही ह्या कार्यासाठी स्वीकार्य नव्हते. होणारही कसे? कारण भूतकाळातील भगवान पदुमुत्तर बुद्धांची - आयुष्मान आनंदांचे भगवान गौतम बुद्धांचे सेवक बनण्याची भविष्यवाणी फलित होण्याची वेळ जवळ आली होती.

आयुष्मान आनंद भगवानांना आठ अटी मान्य करवून त्यांचे स्थायी सेवक बनले. हा आयुष्मान आनंदचा दूरदर्शीपणा होता, ज्यामुळे त्यांनी भगवानांना ही अट मान्य करायाला लावली - 'भंते! माझ्या अनुपस्थितीत भगवान जो धर्मोपदेश देतील तो मला पुन्हा सांगावा.' ह्यामुळेच आयुष्मान आनंदनी भगवानांची सारी वाणी ऐकली व पाठ केली. आयुष्मान आनंदच्या ह्या गुणांमुळेच भगवानांनी त्यांना बहुश्रुतात अग्र घोषित केले.

आयुष्मान आनंद अतिशय बुद्धिमान होते. एकदा ऐकलेले त्यांच्या

स्मृतिपटलावर अंकित होत होते, जसे एखादी गोष्ट कॉम्पुटरमध्ये फिड केलेली असते व कोणीही जेव्हा वाटेल तेव्हा ती ऐकू व पाहू शकतो. त्यांच्या ह्या गुणांमुळेच भगवान गौतमांनी त्यांना आपल्या स्मृतिमान श्रावकांमध्ये अग्र घोषित केले.

पंचवीस वर्षापर्यंत आयुष्मान आनंद मैत्री चित्ताने भारलेल्या काया कर्माने, वाचा कर्माने व मनो कर्माने, सोबत न सोडणाऱ्या सावलीप्रमाणे भगवानांच्या सेवेत तल्लीन राहिले. आयुष्मान आनंदच्या ह्या गुणांमुळेच ते भगवानांच्या सेवक श्रावकात अग्र प्रतिष्ठापित झाले.

धृतिमान आनंद भगवानांशी व महाश्रावकांशी धर्मचर्चा करण्यात, धर्मश्रवण व धर्मोपदेश ऐकण्यात रुची ठेवीत होते. प्रश्न विचारुन आपल्या शंकांचे समाधान करुन घ्यायचे. भगवानही वेळोवेळी आयुष्मान आनंदांना धर्माच्या लक्षणांचे (अनित्य, दुःख, अनात्म) महत्व समजवून सांगायचे. चार आर्यसत्य, आर्य अष्टांगिक मार्ग, प्रतित्यसमुत्पाद, आनापान-स्मृति, समाधी इत्यादी धर्मांच्या अंगांना (शील, समाधी, प्रज्ञा) विविध दृष्टिकोनांनी समजावयाचे.

संपूर्ण बुद्धवाणी पाठ असूनही व भगवानांच्या इतक्याजवळ असूनही आयुष्मान आनंद भगवानांच्या जीवनकाळात स्रोतापन्नच राहिले. भगवानांच्या परिनिर्वाणानंतर आपल्या सत्प्रयत्नांमुळेच अरहंत अवस्थेस प्राप्त झाले. खरे तर प्रत्येक व्यक्तीला आपल्या प्रयत्नानेच मुक्त अवस्था प्राप्त करावी लागते. त्यामुळे भगवान भिक्षूंना वेळोवेळी सचेत करीत राहायचे - "भिक्षूनों! जे एका अनुकंपक, हित इच्छिणाऱ्या शास्त्याला केले पाहिजे ते मी तुमच्यासाठी केले आहे. आनंद! हे वृक्षमूळ आहे, शुन्यागार आहे, ह्यात बसून ध्यान करा, प्रमाद करु नका, नंतर पश्चाताप करु नका. तुमच्यासाठी माझी हीच शिकवण आहे."

अनेक प्रसंगात भगवानांनी आयुष्मान आनंदची प्रशंसा केली. जसे - "भिक्षूनों! आनंद शैक्ष्य (शिकणारा) आहे, तरीही प्रज्ञेत ह्याची बरोबरी करणारा क्वचितच सापडेल."

"भिक्षूनों! आनंद ज्ञानी आहे, महाप्रज्ञ आहे, जर तुम्ही मला विचाराल तर मी ही ठिक तसेच समजावीन जसे आनंदने सांगितले. त्याचा हाच अर्थ

आहे, ह्याला चांगल्याप्रकारे धारण करा.”

“आयुष्मान आनंद भिक्षू-भिक्षूणी, उपासक-उपासिका, तैर्थिक व भगवान सर्वांचेच प्रिय होते. महाश्रावक सारिपुत्तांशी यांचा विशेष स्नेह होता. वादविवाद न करता, दुध-जलाप्रमाणे एकत्र होऊन, एक दुसऱ्याचे सम्मोदन करीत. एक दुसऱ्याला मैत्रीपूर्ण नेत्रांनी पहात विहार करायचे. आयुष्मान सारिपुत्तांच्या दृष्टीत आयुष्मान आनंद अर्थकुशल, धर्मकुशल, व्यंजनकुशल निरुत्तीकुशल, पूर्वापरकुशल होते.”

वेळोवेळी आयुष्मान आनंद श्रावक-श्राविकांच्या, उपासक-उपासिकांच्या व तैर्थिकांच्या आवश्यकता पूर्ण करायचे. श्रेष्ठी अनाथपिडिंकाच्या विनंतीनुसार आयुष्मान आनंदनी भगवानांची अनुमती प्राप्त करुन बोधिवृक्षाचे रोपण करविले, ज्यामुळे तेथील वातावरण उत्साहाने भरुन गेले. आनंदच्या सत्प्रयत्नांनी हा वृक्ष लावला गेला त्यामुळे पुढे जाऊन हा आनंदबोधीच्या नावाने प्रसिद्ध झाला.

भगवानांची मावशी महाप्रजापती गौतमीने जेव्हा भगवानांच्या धर्मविनयात स्त्रियांसाठी प्रव्रजेची अनुमती मागितली, तेव्हा भगवानांनी त्याला निषिध्द ठरविले. गौतमीने हे आयुष्मान आनंदला सांगितले. आयुष्मान आनंदनी आपल्या व्यवहार कौशल्याने भगवानांकडून स्त्रियांसाठी धर्मविनयात प्रव्रजेची अनुमती मिळविली.

बहुश्रुत, स्मृतिमान, चतुर, धृत्तिमान, सेवक भिक्षूत अग्र व अनेक गुणांनी संपन्न असूनही शैक्ष्य आनंद माराच्या जाळ्यातून वाचू शकले नाहीत. प्रसंग -

“आनंद! ज्या कोणी चार ऋद्धिपादांना योग्यरीत्या भावित केले आहे, ते जर इच्छा असेल तर कल्पभर थांबू शकतात अथवा कल्पाच्या उरलेल्या भागापर्यंत.” भगवानांद्वारे असा स्पष्ट संकेत मिळूनही आयुष्मान आनंद भगवानांच्या आशयाला समजू शकले नाहीत आणि न त्यांनी भगवानांना प्रार्थना केली की भंते! भगवान अनेकांच्या हित-सुखासाठी कल्पभर थांबा. त्यावेळी माराने आयुष्मान आनंदच्या मनावर ताबा मिळवला होता.

भगवानांनी आपल्या महापरिनिर्वाणाच्या पूर्वी आयुष्मान आनंद व भिक्षूंना जीवन-जगताच्या अनेक सत्यांविषयी शेवटी पुन्हा एकदा माहिती दिली. तसेच सद्धर्माच्या चिरस्थायी होण्याबाबत व संघाच्या प्रगतीबाबत भिक्षूंना सांगितले.

चार आर्यसत्यांचे महत्व समजवून देतांना भगवान म्हणाले - "चार आर्यसत्यांचा अनुबोध व प्रतिवेध न होण्यामुळे जगात प्राण्यांचे येणे-जाणे सुरु आहे. जेव्हा ह्या चार आर्यसत्यांना योग्य प्रकारे जाणले जाते, तेव्हा भवतृष्णा नष्ट होते आणि लोक दुःखाच्या पार निघून जातात."

"हे आनंद! दुसऱ्यांचा आश्रय न शोधता आपले द्विप, आपला आधार स्वतः बनून विहार करा. धर्माला आपला द्विप बनवून, धर्माच्या साह्याने विहार करा." त्यानंतर भगवानांनी स्पष्ट केले की कोणी कसे चार सतिपट्ठानांची (स्मृतिप्रस्थानांची) भावना करीत वरील प्रकारे विहार करतो.

"भिक्षूनों! स्मृति आणि संप्रज्ञानासोबत विहार करा, हीच माझी (तुमच्यासाठी) शिकवण आहे."

"भिक्षूनों! माझ्याद्वारे जे धर्म- **चार स्मृतिप्रस्थान, चार सम्यक प्रधान, चार ऋद्धिपाद, पाच इंद्रिय, पाच बळ, सात बोध्यंग, आर्य अष्टांगिक मार्ग** - तुम्हाला उपदेशित केले गेले आहेत, त्यांना चांगल्याप्रकारे शिकून अभ्यास करा, भावित करा, अनेकदा भावना (अनुभव) करा. ज्यामुळे हे ब्रम्हचर्य चिरस्थायी होवो, देवता आणि मनुष्यांसाठी कल्याणकारी सिद्ध होवो."

"भिक्षूनों! सर्व संस्कार व्यय-धर्मा (नष्ट होणारे) आहेत. प्रमादरहित होऊन (ह्या सत्याला) संपादन करा."

"ह्या धर्मविनयात जे अप्रमादी होऊन विहार करतील, तेच भव संसरणाचा प्रहाण (त्याग) करुन दुःखांचा अंत करु शकतील."

वैशाख पौर्णिमेला जेव्हा भगवानांच्या महापरिनिर्वाणाची वेळ जवळ येऊ लागली तेव्हा अवितरागी (आसक्त) असल्यामुळे आयुष्मान आनंद स्वतःला सांभाळू शकले नाहीत. ते विहारात जाऊन रडू लागले. भगवानांनी त्यांना बोलविले व सांत्वना देत म्हणाले, "आनंद! शोक करु नको, रडू नको. मी तर पूर्वीच म्हटले होते - "सर्व प्रिय वस्तूंची ताटातूट होणे निश्चित आहे. त्याची सतत सोबत कशी मिळेल? जे काही उत्पन्न आहे, बनलेले आहे, निर्माण झालेले आहे, ते एक ना एक दिवस नष्ट होईलच. तथागताचे शरीर नष्ट होणार नाही हे शक्य नाही."

"आनंद! तू एकाग्रचित्त होऊन, चिरकाळापर्यंत एकट्याने, अपरिमित हित-सुखासाठी मैत्रीपूर्ण काया-कर्माद्वारे, मैत्रीपूर्ण वाचा कर्माद्वारे, मैत्रीपूर्ण मनोकर्माद्वारे तथागताची सेवा केली आहेस. आनंद! तू पुण्यवान आहेस, निर्वाण साधनेत लागून लवकरच अनास्त्रव बन."

भगवानांनी आयुष्मान आनंदच्या गुणांना उजागर करीत भिक्षूंना म्हटले - "भिक्षूंनो! जर भिक्षू परिषद, भिक्षूणी परिषद तसेच उपासक परिषद, उपासिका परिषद आनंदचे दर्शन करण्यासाठी जातात, तर दर्शनाने भावविभोर होतात; जर आनंद धर्माविषयी भाषण करतो तर भाषणाने भावविभोर होतात आणि जेव्हा आनंद चूप होतो, तेव्हा हे सर्व अतृप्त राहातात."

## भगवानांचा सल्ला

"आनंद! तू माझ्याद्वारे प्रवर्तित ह्या कल्याण मार्गाला (आर्य अष्टांगिक मार्ग - **सम्यकदृष्टी, सम्यकसंकल्प, सम्यकवाणी, सम्यककर्मांत, सम्यकआजीविका, सम्यकव्यायाम, सम्यकस्मृति** व **सम्यकसमाधी**) सुरु ठेव, तू ह्याचा अंतिम पुरुष होऊ नकोस."

विपश्यना विशोधन विन्यास.